# कीर्तनात भाविकांच्या नेत्रांच्या कडातुन अश्रू अलंकापुरीत संजीवन समाधी दिन सोहळा साजरा

**आळंदी / प्रतिनिधी**

ज्ञानराज माउली नाम गजर , पुंडलिका वरदे हरी विठ्ठल, मृदंग, वीणेसह टाळांचा नाद,... आणि केशव महाराज नामदास यांचे हृदयस्पर्शी कीर्तन सेवेत संत महिमा...हरिनाम जयघोष करीत ज्ञानेश्वर महाराज यांचे संजीवन समाधीवर तुळशी फुलांसह विविध रंगी फुलांच्या पाकळ्यांची भाविकांनी केलेली पुष्पवृष्टी झाली. आळंदी मंदिरात घंटानाद होताच हृदयस्पर्शी वातावरणात माउलींचा ७२७ वा संजीवन समाधी दिन सोहळा मंगळवारी ( दि. २२ ) साजरा झाला.

बुधवारी ( दि. २३ ) श्रींचा वैभवी छबिना पालखी मिरवणुकीने हरिनाम गजरात सोहळ्याची सांगता होणार असल्याचे प्रमुख विश्वस्त योगेश देसाई यांनी सांगितले. या सोहळ्यास खासदार संजय जाधव, केशव महाराज नामदास परिवार , आळंदी संस्थानचे सरपंच प्रमुख विश्वस्त योगेश देसाई, विश्वस्त ॲड. विकास ढगे पाटील,विश्वस्त लक्ष्मीकांत देशमुख, पालखी सोहळ्याचे मालक बाळासाहेब आरफळकर, राजेंद्र आरफळकर, मुख्याधिकारी अंकुश जाधव, माजी नगराध्यक्ष राहुल चिताळकर पाटील, पंढरपूर देवस्थान समिती सदस्या ॲड. माधवी निगडे, चोपदार बाळासाहेब रणदिवे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील गोडसे, उपाध्यक्ष वारकरी महामंडळ डी.डी. भोसले पाटील, पुणे जिल्हा शिवसेनेचे माजी जिल्हा प्रमुख डॉ. राम गावडे, ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अजित वडगावकर, माऊली गुळुंजकर, व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, संजय रणदिवे, श्रीधर सरनाईक, मानकरी योगेश आरु, योगिराज कुऱ्हाडे, स्वप्नील कुऱ्हाडे, अरुण बडगुजर,तुकाराम माने, आळंदी नगरपरिषदेचे आजी, माजी नगरसेवक पदाधिकारी, कीर्तनकार, प्रवचनकार, फडकरी, दिंडीकरी, मानकरी उपस्थित होते.

मंदिरातील विना मंडपात परंपरेने संत नामदेवराय यांचे वंशज केशव महाराज नामदास यांची माऊलीचे जीवन चरित्रावर आधारित हृदयस्पर्शी कीर्तन सेवा झाली. दरम्यान विना मंडपा समोर महाद्वारात श्री गुरु हैबतरावबाबा आरफळकर याचे वतीने पालखी सोहळ्याचे मालक बाळासाहेब आरफळकर यांचे नातू ऋषिकेश महाराज आरफळकर ( आळंदीकर ) यांची कीर्तन सेवा झाली. तीर्थक्षेत्र आळंदी परिसरात श्रींचे संजीवन समाधी प्रसंगावर



आधारित विविध ठिकाणी कीर्तन सेवा सुश्राव्य वाणीतून राज्यातील नामवंत कीर्तनकार महाराजांनी रुजू केली. तसेच आळंदी परिसरात ठिक ठिकाणी संत ज्ञानेश्वर महाराज यांचे जीवन कार्यावर आधारित कीर्तन सेवा तसेच समाधी प्रसंगावर आधारित कीर्तन सेवा सुश्राव्य वाणीतून नामवंत महाराजांनी सादर केली.

संत नामदेव महाराज यांचे अभंगावर आधारित वंशज केशव महाराज नामदास यांनी मंत्रमुग्ध करणाऱ्या हृदयस्पर्शी वाणीतून कीर्तन सेवा केली. माऊलींचे संजीवन समाधी सोहळ्यात कीर्तन करीत असताना महाराजांचे डोळ्यांतून अनेक वेळा आश्रुंचा बांध फुटला. यावेळी अनेक भाविकांच्या नेत्रांचे कडा देखील पान्हवल्या. माऊलींचे समाधी सोहळ्याचे प्रसंगावर आधारित कीर्तनात भक्त भारावले. यावेळी नामदास महाराज यांनी संत ज्ञानेश्वर महाराज यांचे जीवन चरित्र अनेक संतांच्या संत वचनाचे दाखले प्रमाण देत सांगत कीर्तन सेवा रुजू केली. आळंदीत श्रीचे संजीवन समाधी प्रसंगाचे वर्णन आणि जीवन चरित्र श्रवण करताना अनेक नागरिक,वारकरी, भाविकांच्या डोळ्याच्या कडाही पान्हावल्या आणि श्रीचे संजीवन समाधी प्रसंगाच्या कल्पनेने उपस्थित भाविकही गहिवरुण गेले. केशव महाराज नामदास यांचे हृदयस्पर्शी कीर्तन सेवेत भक्ती चैतन्यमयी वातावरणात श्रीचे संजीवन समाधी सोहळा प्रसंगावर कीर्तन झाले.

माउलीचे मंदिरात श्रीचे संजीवन समाधी दिनास विविध धार्मिक कार्यक्रमांनी भल्या पहाटेच सुरुवात झाली. पहाटे पवमान अभिषेक, दुधारती आळंदी देवस्थानचे सरपंच प्रमुख विश्वस्त योगेश देसाई यांचे हस्ते प्रथा परंपरेप्रमाणे झाली. याप्रसंगी विश्वस्त ॲड विकास ढगे पाटील, नामदास महाराज परिवार उपस्थित होते.

संत नामदेवराय यांचे वतीने नामदास परिवारातर्फे महापूजा परंपरेने करण्यात आली. तसेच मंदिरात भाविकांच्या देखील चल पादुकांवर महापूजा झाल्या. दर्शन कमी वेळेत जास्त भाविक कसे घेतील यासाठी प्रभावी नियोजन करण्यात आले होते. कीर्तन सेवा रुजू करून हैबतरावबाबा यांचे दिंडीची मंदिरात हरीनाम गजरात प्रदक्षिणेस प्रवेश झाला. श्रींचे गाभा-यात संत नामदेवराय पादुकासह श्रीची पूजा, आरती, श्रींचे संजीवन समाधी समीप नामदेवरायांचे वैभवी पादुकांची पूजा झाली. पुंडलिका वरदेव हरी विठ्ठल, माउली ज्ञानोबा, माउली, ज्ञानोबा-तुकाराम असा नामजयघोष होताच घंटानाद करण्यात आला.

---

## थोडक्यात

### ॲट्रॉसिटी प्रकरणी चौघांवर गुन्हे

**शिक्रापूर** : शिक्रापूर ता. शिरूर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये शिक्रापूरच्या सरपंच रमेश गडदे यांना जातीवाचक शिवीगाळ, दमदाटी केल्याची घटना ताजी असताना आता कोरेगाव भीमा येथील एका युवकाला दुकानात घुसून जातीवाचक शिवीगाळ, दमदाटी करत मारहाण केल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे शुभम वाळके यांच्या सह चौघांवर ॲट्रॉसिटी प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

कोरेगाव भीमा ता. शिरुर येथील जयदीप उर्फ राकेश पोटे हा त्याच्या कुशनचे दुकानात असताना एक इसम सायंकाळच्या सुमारास दुचाकीचे शीट कव्हर बसवण्यासाठी आला, मात्र जयदीप याच्या पत्नीने त्याला औषध घेऊन येण्यास सांगितल्याने जयदीप घरी गेला त्यामुळे दुचाकीला शीट कव्हर बसवण्यास उशीर झाल्याने सदर दुचाकी चालक शुभम वाळके याने जयदीपला शिवीगाळ, दमदाटी करत हाताने मारहाण केली त्याचवेळी शुभम याने त्याच्या काही मित्रांना फोन करुन बोलावून घेतले त्यावेळी त्याचे तीन मित्र सदर ठिकाणी आले त्यांनी देखील दुकानात घुसून जयदीपला जातीवाचक, शिवीगाळ, दमदाटी करत लाकडी दांडक्याने मारहाण केली, यावेळी जयदीपच्या मामाचा मुलगा विशाल कांबळे भांडणे सोडवण्यास आला असता त्याला देखील जातीवाचक शिवीगाळ, दमदाटी करत मारहाण केली.

---

## महाराष्ट्राचा सातत्याने अपमान करणाऱ्यांचा कुटील डाव हाणून पाडणार : अजित गव्हाणे

**पिंपरी :** भारतीय जनता पक्षाकडून महाराष्ट्राला चुकीच्या दिशेने नेलं जातात आहे. हा कुटील डाव थांबवावा लागेल. मतं मागताना छत्रपती शिवाजी महाराज/ महात्मा फुले यांची नावे घेतात. पण नंतर याच महापुरुषांचा अपमान करून राज्यातील वातावरण बिघडविण्याचे काम भाजपा करत आहे. महाराष्ट्राचा सातत्याने अपमान करणाऱ्यांचा कुटील डाव राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हाणून पाडणार आहे. यापुढे महाराष्ट्राच्या महापुरुषांचा अपमान सहन करणार नाही असा सज्जड इशारा पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी दिला. राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबाबत केलेल्या अपमानास्पद वक्तव्याच्या निषेधार्थ पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने मंगळवारी आंबेडकर चौकात तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी भारतीय जनता पक्ष आणि राज्यपाल कोश्यारी यांचा अजित गव्हाणे यांनी खरपूस समाचार घेतला. आंदोलनात कोश्यारी यांच्या निषेधाची फलके लावून त्यांनी महाराष्ट्राची माफी मागण्याची मागणी करण्यात आली.

---

## पिंपरी-चिंचवड येथील शासकीय वसतिगृहात प्रवेश प्रकियेला सुरुवात

**पुणे / प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड सेक्टर ४ येथील मागासवर्गीय गुणवंत मुलांचे शासकीय येथे विनामूल्य प्रवेश देण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाकरीता अनुसूचित जाती- ५७, विशेष मागास प्रवर्ग -२, अनाथ-२ जागेकरीता प्रवेश देण्यात येणार आहे. पुणे-पिंपरी-चिंचवड, मोशी प्राधिकरण परिसरात इयत्ता ११ वी, पदविका अभ्यासक्रमाचे पहिले वर्ष, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षात प्रवेश घेतलेल्या बाहेरगावच्या विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याकरिता वसतिगृहात जावून नोंद करावी.

या वसतिगृहामध्ये प्रवेशितांना विनामूल्य निवास व भोजन, पुस्तके, स्टेशनरी आदीकरीता शासनाने ठरवून दिलेल्या दराची रक्कम, दरमहा निर्वाह भत्ता ८०० रुपये विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बचत खात्यावर जमा करण्यात येते.

विद्यार्थी हा पुणे, पिंपरी-चिंचवड, मोशी प्राधिकरण येथील महाविद्यालयात शिक्षण घेणारा असावा. प्रवेशासाठी मागील वर्षात उत्तीर्ण झाल्याबाबतची गुणपत्रिका, प्राधिकृत अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीचे जात प्रमाणपत्र, वडिलांचे उत्पन्न प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, चालू महिन्याचे महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र, विद्यार्थी व पालकाचे आधारकार्ड, शिधापत्रिकेची छायांकित प्रत, महाविद्यालय प्रत्यक्ष सुरु असल्याबाबत प्राचार्य यांचे लेटरहेडवर लेखी हमीपत्र या कागदपत्रांची आवश्यकता असल्याची माहिती वसतिगृहाचे गृहपाल एम. डी. वाघमारे यांनी दिली आहे.

---

## शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन तातडीने पूर्ववत करा !

### बाळासाहेबांची शिवसेना गटाची विद्युत वितरण कडे मागणी

**शिक्रापूर / प्रतिनिधी**

सध्या शेतकऱ्यांच्या शेतात पिके उभी राहत असताना विद्युत वितरण विभागाकडून कोणतीही पूर्वकल्पना न देता शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन बंद करण्यात आलेले असल्याने शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन तातडीने पूर्ववत करण्याची मागणी बाळासाहेबांची शिवसेना गटाने विद्युत वितरण विभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन देत केली आहे.



शिक्रापूर ता. शिरुर येथील उपकार्यकारी अभियंता कार्यालयात आज बाळासाहेबांची शिवसेना गटाचे उपजिल्हा प्रमुख अनिल काशीद, शिरुर तालुका प्रमुख रामभाऊ सासवडे, उप तालुका प्रमुख संतोष वर्पे, शिवाजी नवले, शरद नवले संपत कापरे, तेजस फलके, गणेश कोतवाल, आनंदा हजारे, रोहिदास शिवले, बापूसाहेब मासळकर, सागर दरेकर, युवा सेना सोशल मिडीया तालुका प्रमुख मोहन घोलप, युवा सेना जिल्हा सरचिटणीस वैभव ढोकले, हरिदास डफळ, सत्यवान पावसे, दत्तात्रय गिलबिले, ज्ञानेश्वर फराटे, यांसह आदी उपस्थित होते. दरम्यान यापूर्वी अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांना कोणतेही पिक घेता आलेले नसल्यामुळे शेतकऱ्यांना कोणतेही उत्पन्न मिळालेले नाही मात्र सध्या शेतात पिके उभी राहत असताना विद्युत वितरण विभागाने अचानक कोणतीही पूर्व कल्पना न देता शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन कट केल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे त्यामुळे विद्युत वितरण विभागाने शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन पूर्ववत करण्याची मागणी करण्यात आली आहे.

***शिवसेना पदाधिकाऱ्यांचे निवेदन वरिष्ठ कार्यालयास पाठवून त्यांच्या भावना मांडण्यात येणार आहे मात्र शेतकऱ्यांनी देखील वीजबिल भरुन महावितरणला सहकार्य करणे अपेक्षित आहे असे विद्युत वितरण विभागाचे उपकार्यकारी अभियंता नितीन महाजन यांनी सांगितले.***

---


**ग्रामपंचायत वढू खुर्द, ता. हवेली, जि. पुणे**

**खुली निविदा सूचना**

**बी-१ सूचना क्र. ०३ सन २०२२-२३**

सरपंच, ग्रामपंचायत वढू खुर्द, ता. हवेली, जि.पुणे यांचे वतीने तर्फे जि.प.पुणे नोंदणीकृत कंत्राटदारांकडून दोन लिफाफा पद्धतीने खालील सीलबंद निविदा मागवण्यात येत आहेत. कोऱ्या निविदांचा नमुना ग्रामपंचायत वढू खुर्द, ता. हवेली जि.पुणे यांच्याकडून दि. २३-११-२०२२ ते ३०-११-२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत देण्यात येतील व भरून पाठविलेले मोहरबंद निविदा दि. २३-११-२०२२ ते ३०-११-२०२२ पर्यंत सायं. ०४.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत वढू खुर्द, ता. हवेली येथे स्वीकारण्यात येतील. मोहरबंद निविदा दि. ०१-१२-२०२२ रोजी सं. ०४.०० वा. उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. | निविदा फी रु. | ठेकेदार वर्गीकरण | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे वढू खुर्द येथील रामनगर गल्ली नं. ७ येथे रस्ता मुरुमीकरण करणे, ता. हवेली (ग्रामनिधी) | १,५९,१८६/- | ११२/- | सु. बे अभियंता | ६ महिने |

**१.** कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. **२.** कोऱ्या निविदा नमुन्याची फी ग्रामपंचायत वढू खुर्द ता. हवेली येथे भरून निविदा उपलब्ध होतील. **३.** ठेकेदाराने कोरी निविदा मागणी अर्जासोबत प्रमाणित नोंदणी दाखला सादर करणे आवश्यक आहे. **४.** कोऱ्या निविदा रक्कमेच्या १% इसारा रक्कम कोणत्याही बँकेचा डी. डी ग्रामपंचायत वढू खुर्द या नावे असलेला लिफाफा क्र. १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय आर्थिक लिफाफा उघडला जाणार नाही. **५.** कोऱ्या निविदांच्या तांत्रिक लिफाफा मध्ये द्यावयाची कागदपत्रे **१. निविदा फी पावती, २. नोंदणी प्रमाणपत्र, ३. प्राप्तीकर प्रमाणपत्र, ४. वस्तू व सेवा कर प्रमाणपत्र.**

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत वढू खुर्दता. हवेली, जि. पुणे**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत वढू खुर्दता. हवेली, जि. पुणे**



**पुणे महानगरपालिका**

**निविदा प्रक्रिया कक्ष**

**निविदा जाहिरात नविन कामे**

विक्री कालावधी दिनांक :-२३/११/२०२२ ते ०२/१२/२०२२ दुपारी १२.०० पर्यंत — **जाहिरात क्र. १/९३८ दि. २२/११/२०२२**

स्विकृती दिनांक:- २३/११/२०२२ ते ०२/१०/२०२२ दुपारी १२.३० पर्यंत — तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : ०५/१२/२०२२ दुपारी १२.३० वा.

| अ. क्र | निविदा क्र. | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्वगणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू | कामाची मुदत | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | PMC/ GARDEN / 2022/216 | उद्यान विभाग | पाषाण-सुतारवाडी रोपवाटिका, पाषाण तलाव येथील जॉगिंग ट्रॅक ची हॉर्टिकल्चर विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ७६९.०० | १२९९९८९.०० | १३०००.०० | २ महिने | श्री. तुम्माले ९६८९९३००१४ |
| २. | PMC/ GARDEN / 2022/217 | उद्यान विभाग | झाडांची हलवाहलव करणे अंतर्गत पाषाण नर्सरी येथे वृक्षारोपणाकरिता रोपे पुरविणे. | ७६९.०० | १२९९९००.०० | १३०००.०० | २ महिने | श्री. तुम्माले ९६८९९३००१४ |

**सही/-**
**(अशोक घोरपडे)**
**मुख्य उद्यान अधिक्षक**
**पुणे महानगरपालिका**

**पाणीपुरवठा विभाग**

विक्री कालावधी :- २३/११/२०२२ पासून २९/११/२०२२

स्विकृती दिनांक :- २३/११/२०२२ पासून २९/११/२०२२

तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक: - ३०/११/२०२२ दुपारी ३.०० पर्यंत

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | PMC/Water Supply / 2022/552 | पाणीपुरवठा विभाग | पद्मावती पंपिंग स्टेशन मधील बिबवेवाडी झोनची जुनी रायझिंग मेन पाईप लाईन बदलणे व इतर कामे करणे. | १,३५९.०० | १६,९२,७६४.०० | १६,९२८.०० | २ महिने | श्री. संदीप देवकाते मो.नं. ७७०९९३९०१२ |

**अ)** पुणे मनपाची वरील काम ही अनुभवी ठेकेदाराकडून करुन घ्यायची आहेत. **ब)** सदर कामाबाबत निविदा अटी शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्यें नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईट वर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरुन फक्त ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहे. **क)** निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास व स्विकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील. **ड)** ऑनलाईन निविदा प्रक्रियेबाबतची संपूर्ण माहिती पाणीपुरवठा विभाग पुणे मनपा येथे मिळेल. **ई)** कार्यालयीन आदेश क्र.अतिमआ (वि)/३२/२२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम इ.सी.एस./आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी. सुविदेमार्फत स्वीकारण्यात येणार आहे.

**सही/-**
**प्रमोद हुगे**
**कार्यकारी अभियंता (वि)**
**पर्वती जलकेंद्र**
**पुणे महानगरपालिका**



**एल&टी फायनान्स लिमिटेड**
**नोंदणीकृत कार्यालय:** 15वा मजला, पीएस श्रीजन टेक पार्क, प्लॉट नं. 52, ब्लॉक डीएन, सेक्टर V, सॉल्ट लेक सिटी कोलकाता 700 091, जिल्हा 24-परागणा उत्तर.
**CIN No.:** U65910WB1993FLC060810
**शाखा कार्यालय:** पुणे

L&T Financial Services

**तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव**

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रचना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी ''**सार्वजनिक लिलावाद्वारे**'' ''**जिथे आहे जसे आहे तत्वावर**'' आणि ''**ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर**'' खालील मालमत्तेचा लिलाव करीत आहेत.

| कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 09/11/2022 नुसार (रुपयांमध्ये) | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. राजन वामनराव अंगणे<br>2. आनंद अंगणे | मालमत्तेचा पत्ता - मालमत्तेचा प्रत्येक आणि सर्व भाग<br>मालमत्तेचा पत्ता - पेंटहाउस क्षेत्रफळ 4781 चौरस फिट त्यासोबत ''निर्मला लुईझा रेसिडंसी''च्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर असलेल्या जागेत अनुपातिक अखंडित शेअरसह, ही इमारत सर्व्हे नंबर 122/41 ए, ए,बी,सी,डी, ई, 122/42, मौजे, तालुका-तिसवाडी, गोवा, जे अँड के बँकेजवळ, सेंट आयनेझ, एसव्हाय नं., सेंट आयनेझ, तिसवाडी तालुका, पणजी, उत्तर गोवा येथे असलेल्या 923 चौरस मीटर भूखंडावर उभी आहे, तिच्या सीमा अशा-<br>पूर्व: सिल्व्हेरांचा प्लॉट<br>पश्चिम: प्लॉट आणि दि पॅडी फिल्ड्स कोवानाची टोलोईची सीमा<br>उत्तर: श्री. बिकू श्रीनिवास ह्यांचा प्लॉट<br>दक्षिण: श्री. सिल्व्हेरा ह्यांचा प्लॉट | GOAHL16000016, GOAHL16000083, GOAHL16000108, GOAHL16000084, GOAHL16000115 | 27 एप्रिल 2022 | रु.19,45,234.7 | रु.6,20,10,674.26 | रु.1,94,52,347/- | 02/12/2022 | 10/12/2022 |

**सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम**

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता ''**जशी आहे जिथे आहे तत्वावर**'' आणि ''**जशी आहे ज्या स्थितीत आहे**'' त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **02/12/2022.** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **10/12/2022** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **12/12/2022** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहितीसाठी, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना संपर्क करावा म्हणजे मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहिती, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना म्हणजे ''**नाव- शांताराम शेणॉय, एम +91 9822989925 पत्ता: एल&टी फायनान्स लि.- ऑफिस नं. 301, 3रा मजला, झेनित कॉम्प्लेक्स, साकार संकुलाजवळ, शिवाजी नगर, पुणे - 411005 आणि अंकीत विग, संपर्क क्रमांक - 8668943242, एल&टी फायनान्स लि. ऑफिस: 6वा मजला, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीस शोरुमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098**'' या पत्त्यावर संपर्क साधावा. लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी बोली/प्रस्ताव स्विकारू/नाकारू/बदल/रद्द करु शकतात किंवा कोणतेही कारण न देता आणि पूर्वसूचना न देता लिलावपुढे नेऊ शकतात.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 23.11.2022
**ठिकाण:** पुणे

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड


**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अशोक विठ्ठल सोनवणे** यांनी शितल प्रिंटर्स, भूषणनगर, पोस्ट केडगाव (देवी) तालुका आणि जिल्हा अहमदनगर पिन-४१४००१ (महाराष्ट्र) येथे दैनिक लोकमंथन मुद्रित केले. व ४३१ सोमवार पेठ, सिद्धीविनायक केशर पुणे पिन नंबर ४११०११ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक - अशोक विठ्ठल सोनवणे** RNI : MAHMAR/२०११/४०९८३. Email - lokmanthan.pune@gmail.com